दैनिक
आपल्या लोकांचा
# सत्यवादी
संपादक : शेख रेहान
www.esatyawadi.com
मो. 9822728340

## आरक्षणाच्या मागणीसाठी मुस्लिम समाज आज रस्त्यावर

**बीड । सत्यवादी**

मुस्लिम समाजाला शिक्षण व शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी उद्या बीड शहरात भव्य एल्गार मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चामध्ये जिल्हाभरातून हजारो मुस्लिम बांधव सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

गेल्या १५ ते २० दिवसांपासून या मोर्चाची जोरदार तयारी सुरू असून, विविध भागांमध्ये कॉर्नर बैठका घेऊन नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनाला विविध राजकीय पक्ष

(पान २ वर...)

## नुसते कागदाचे तुकडे देऊन आरक्षणास पाठिंबा देणारे

# खासदार संसदेत, आमदार विधानसभेत मुस्लिमांसाठी तोंड उघडणार का?

### हे पत्र म्हणजे, मैने तुम्हारे आंखे और शुक्रिया बोलकर आपने मेरे कान खुश किये!

**बीड । सत्यवादी**

आज मुस्लिम आरक्षणासाठी एल्गार मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. याची महिनाभरापासून तयारी सुरू आहे. या दरम्यान मंत्री पंकजा मुंडे, आ.सुरेश धस, आ.नमिता मुंदडा वगळता जवळपास सर्व आमदारांनी आणि खासदारासह काही माजी आमदारांनी पत्र काढून या मोर्चाला पाठिंबा जाहीर केला. एकप्रकारे पाठिंब्याची स्पर्धा लागलेली दिसून आली. पण येथे पाठिंबा जाहीर करणारे हे खासदार, आमदार सभागृहात आवाज उठवण्याची हिंमत दाखवणार का? असा

(पान २ वर...)

### अनेकांचा पाठिंबा, उपस्थितीकडे लक्ष

खासदार, आमदार, माजी आमदार, अनेक मोठे नेते, जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष, संघटना असे शेकडोंनी पत्र देऊन मुस्लिम आरक्षण मोर्चाला पाठिंबा दिला. पण आज खरा चेहरा उघड होणार असून, या मोर्चाला कोण-कोण उपस्थित राहणार? याकडे लक्ष लागले आहे.



### बजरंग बप्पा, बस्स झाल्या गप्पा!

लोकसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाने मोठ्या प्रमाणात बजरंग सोनवणे यांना मतदान केले. निवडणूक प्रचाराच्या काळात त्यांनी खूप आश्‍वासने दिली पण आता जवळपास दोन वर्ष संपण्याच्या मार्गावर आहेत. या काळात त्यांनी केलेलं एक काम दाखवावं (रेल्वेच्या आयत्या पिठावर रेघोट्या मारलेल्या सोडून) अशी चर्चा सुरू झाली असून, बप्पा, आता बंद करा गप्पा! असे बोलले जात आहे. त्यांच्यासाठी समाज अनेकांच्या डोळ्यावर आला. अनेकांनी टार्गेट केले, मुस्लिमांवा वोट जिहादचा ठप्पा मारण्यात आला, आणि बप्पा तुम्ही समाजाला काय दिले? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.




### तेरा कोटीच्या बसस्थानकात महिलांना छत नाही!

बीड - शहरातील मुख्य बसस्थानकाचे तेरा कोटी खर्चुनसुद्धा बोगस काम करण्यात आले, या बसस्थानकात प्यायला पाणी नाही, महिलांना महिला असल्याचे ओळखपत्र म्हणजेच स्मार्ट कार्ड काढण्यासाठी भरउन्हात उभे रहावे लागत आहे, त्यांना पत्र्याचे छतसुद्धा नाही. याकडे लोकप्रतिनिधी, समाजसेवक, आगारप्रमुखांचे सपशेल दुर्लक्ष आहे. गुरुवारी काढलेल्या या छायाचित्रात त्रस्त वृद्ध महिला, मुली लाईनमध्ये उभ्या असलेल्या दिसत आहेत. याबद्दल सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. (छाया-शेख एजाज)

### आठवडाभरात विजेच्या मागणीत मोठी वाढ

**मुंबई । सत्यवादी**

उन्हाच्या तप्त झळा सुसह्य करणारी वातानुकूलित यंत्रणा, कुलर, पंखे यांचा वापर वाढल्याने मुंबईसह राज्यभरात विजेच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे.

(पान २ वर...)

## सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार आता मोठी घरे!

**मुंबई । सत्यवादी**

सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या संरचनेत तब्बल २२ वर्षांनंतर बदल करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या घरांचे क्षेत्रफळात १०० चौरस फुटांपासून ते ७०० चौरस फुटांपर्यंत वाढ झाली आहे. सनदी अधिकाऱ्यांच्या घरांचे क्षेत्रफळ हे २५०० चौरस फूट तर सर्वात कमी वेतनगटाचे


(पान २ वर...)

## बनावट खरेदीखत असूनही शिवाजीनगर ठाण्याकडून गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ

### आरोपी-पोलीसांमध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय

**बीड । सत्यवादी**

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बीड येथील रहिवासी शेख आकबर शेख दगडुभाई यांनी केलेल्या गंभीर तक्रारीनंतरही पोलीसांकडून गुन्हा दाखल करण्यात येत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तक्रारदार शेख अकबर यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या वडिलांच्या नावावर





असलेल्या मालमत्तेवर काही भू-माफियांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीररित्या खरेदीखत करून फसवणूक केली आहे. या प्रकरणात बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड, बनावट व्यक्ती नामें शेख युसूफ शेख शब्बीर याचा वापर करून मझर खान, इनूस खान,शेख इम्रान उर्फ बड्डा तसेच त्याच्या तसेच इतर सहकाऱ्यांनी बनावट कागदपत्रांचा

(पान २ वर...)

## आजच्या आरक्षण मोर्चात बहुसंख्येने सहभागी व्हा!





### मौलाना आझाद युवा मंचने केले आवाहन

**बीड । सत्यवादी**

मुस्लिम समाजासाठी रद्द करण्यात आलेल्या पाच टक्के आरक्षणाच्या पुनर्स्थापनेसाठी येत्या १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य एल्गार मोर्चामध्ये बीड जिल्ह्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मौलाना आझाद युवा मंचतर्फे करण्यात आले

(पान २ वर...)

## कबाडगल्ली येथील किरकोळ वादाला जातीय रंग देऊ नये!

### सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांचे आवाहन

**बीड । सत्यवादी**

बीड शहरातील कब्बाडगल्ली येथे काही दिवसांपूर्वी माजी न.प.सभापती बाळासाहेब जाधव आणि सागर देशपांडे यांच्यात कचरा व बोअर समस्येवरून किरकोळ वाद झाला होता. यावेळी नगरसेविका पती सागर देशपांडे यांना जाब विचारल्यामुळे वाद वाढून दोघांमध्ये हलकी झटापट झाली. या प्रकरणी बीड

(पान २ वर...)




## एलसीबीने राजुरीत छापा टाकून अडीच लाखाचा गुटखा पकडला

**बीड । सत्यवादी**

महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्यांविरुद्ध बीड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने नवगण राजुरी येथील एका दुकान गाळ्यावर छापा टाकून सुमारे २,४५,३२८/- रुपये किमतीचा अवैध गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज दि. १६ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नवगण राजुरी परिसरात अवैध धंद्यांच्या प्रतिबंधासाठी पेट्रोलिंग

(पान २ वर...)

## ग्रामीण पोलीसांची ट्रॅव्हल्स्‌वाल्यांकडून थकीत दंडाच्या नावाखाली हप्ता वसूली!




### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली

**बीड । सत्यवादी**

बीडमध्ये टॅव्हल्स्‌ चालकांकडून बीड ग्रामीण ठाण्याचे पोलीस बळजबरीने थकीत दंड वसूल करीत असून हे प्रकारे दंडाच्या स्वरुपात हप्तेच वसूली करत असल्याचे दिसत आहे. ग्रामीण पोलीसांची ही वसूली न्यायालयाच्या आदेशाची पायमल्लीच करत आहे, थकीत दंड असला तरी सक्तीने वसूली करु नये असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतांनाही ग्रामीण पोलीसांनी त्या आदेशाला केराची टोपलीच दाखवली आहे.

बीडमध्ये ट्रॅव्हल्स चालकांकडून बळजबरीने थकीत दंड वसूल केल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. काही ट्रॅव्हल्स व्यावसायिकांनी असा दावा केला आहे की, ग्रामीण पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी हप्त्यांच्या स्वरूपात दंड वसुली करण्यासाठी दबाव टाकत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वाहनांवर थकीत दंड असला तरी तो सक्तीने वसूल करू नये, असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत. मात्र, या आदेशाला केराची टोपली

(पान २ वर...)

# पाटोद्याची दरिद्री कधी मिटणार?

## शहरातील तिन्ही पुलांची अवस्था अर्धमेल्यासारखी




**पाटोदा । सत्यवादी**

शहरातील मांजरा नदीवरील साळ नदीवरील पूल व तसेच बाजार समिती जोडणारा ब्रिज कम बंधारा या तीन महत्त्वाच्या पुलांच्या प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष नागरिकांच्या संतापात भर टाकत आहे. लोकप्रतिनिधींनी या संदर्भात लक्ष देऊन सदर तिन्ही पुलाचे काम युद्धपातळीवर चालू करावे अशी सर्वस्तरातून नागरिकांची मागणी होत आहे.

पाटोदा शहरातील मांजरा नदीवरील मुख्य पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, पुलावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा दुचाकीस्वारांचे अपघात होत असून, जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही प्रशासनाकडून केवळ तात्पुरत्या

(पान २ वर...)

# नावापुरती नारीशक्ती

जे अद्याप मोजले गेलेलेच नाही त्याची कल्पना करून त्याच्या आधारे वास्तवात निर्णय घेण्यात कितपत शहाणपण? संसदेच्या आज सुरू होणाऱ्या विशेष अधिवेशनाच्या निमित्ताने या साध्या प्रश्नाचे उत्तर कोणी किमान सुज्ञदेखील नकारार्थीच देईल. हा सुज्ञपणा तथापि केंद्रातील सरकारास मान्य नसावा. संसदेत आज मांडल्या जाणाऱ्या विधेयकावरून असा संशय येतो. या विधेयकाद्वारे महिलांस प्रतिनिधिगृहात ३३ टक्के आरक्षण मिळेल, लोकसभेतील खासदार संख्या ८१५ अधिक केंद्रशासित प्रदेशातून ३५ असे मिळून ८५० इतकी होईल आणि प्रत्येक जनगणनेनंतर मतदारसंघांच्या फेररचनेची अनिवार्यता संपुष्टात आणेल. या तिनांतील दुसरे आणि तिसरे हे पहिल्या विधेयकाच्या मोठेपणाआडून रेटण्यामागील राजकीय उद्देश न समजणे अवघड नाही. 'नारीशक्ती' इत्यादी गोंडस नामकरणाचा खरा उद्देश सारी शक्ती आपल्याच हाती राहावी, हा आहे. हे कोणत्याही राजकीय पक्षास वाटू शकते. राजकारणाचा तो धर्मच आहे. पण त्याचे पालन करताना काही घटनात्मक आणि संघराज्यात्मक अधर्म तर आपण करत नाही ना; याचा विवेक सत्ताधारी पक्षाने दाखवणे अपेक्षित. अशा विवेकाचा पूर्ण अभाव भाजपच्या वर्तनात दिसत असून काँग्रेसचा सत्तासूर्य माध्यान्हीस असतानाच्या काळाला शोभणारी सत्तालोलुपता भाजप पदोपदी प्रदर्शित करू लागला आहे. त्यात भर या सत्तातुरांस अटकाव सोडा; पण साधा वेगमर्यादेचा इशारा देऊ शकेल अशा सर्व नियामकांचे मान टाकणे. त्यामुळेच महत्त्वाच्या विधानसभा निवडणुका ऐन भरात असताना 'नारीशक्ती' म्हणत महिलांस आरक्षणाचे गाजर दाखवण्याचा निर्गल उद्योग संस्कारी भाजप करताना दिसतो. हे असे काही विरोधकांकडून झाले असते तर या संस्कारी पक्षाचे स्वयंसेवक कोण रान उठवते. तेव्हा जे सुरू आहे त्याचा समाचार घेण्यास पर्याय नाही. प्रथम या 'नारीशक्ती'च्या कौतुकाविषयी. सत्ताधारी पक्ष स्त्री-दाक्षिण्याबाबत किती सजग आहे त्याची उदाहरणे देण्यास कुलदीप सिंग सेनेगर या ब्रिजभूषण सिंग असे नामांकित पुरेसे आहेत. तो लौकिक दूर ठेवून आता मुद्दा महिलांस प्रतिनिधिगृहात आरक्षण देण्याचा. भाजप २०१४ पासून सत्तेवर आहे. महिला आरक्षणाचे प्रयत्न नक्की कधी सुरू झाले आणि त्यास यश यावे यासाठी तेव्हापासून आजतागायत भाजपने किती कष्ट उपसले याचेही दाखले अनेक. या संदर्भातील पुढील युक्तिवाद महिला आरक्षणाची गाठ लोकसभेतील खासदार संख्येशी जोडण्याचा. या 'नारीशक्ती'स वंदन वगैरे करण्याबाबत भाजप इतका प्रामाणिक असेल तर त्यांस आहे त्या खासदार संख्येतच आरक्षण देण्यापासून कोणी रोखले? यासाठीही सर्व पक्ष तयार आहेत. तेव्हा जवळपास वाढीव ३०० खासदारांचा भार लवकरच विकसित होणाऱ्या भारतीयांच्या माथ्यावर न घालता आहे त्या खासदार संख्येतच 'नारीशक्ती'स वंदन करणे अधिक शहाणपणाचे. कोणत्याही मुद्द्यावर 'देश प्रथम' असा विचार करणाऱ्या पक्षास देशासमोरील हे नवे खासदारांच्या लोकसंख्येमागून येणारे अर्थसंकट जाणवू नये म्हणजे आश्चर्यच. सत्ताधारी भाजप हा काही काँग्रेससारखा भ्रष्टाचारी नाही. पण तरीही या मुद्द्याचा प्रकाश त्या पक्षाच्या डोक्यात पडत नसेल तर देशासमोरील आव्हान किती गंभीर आहे याची जाणीव व्हावी. दक्षिणेतील राज्ये ती करून देतात. प्रस्तावित दुसऱ्या घटनादुरुस्तीद्वारे खासदार संख्या वाढवली जात असताना अप्रगत, अर्थदुर्बळ, प्रतिगामी गो-पट्ट्यातील लोकप्रतिनिधींची संख्या दणदणीत वाढेल आणि प्रगत, शिक्षित आणि विकसिततेकडे जोमाने निघालेल्या दक्षिणी राज्यांस कमी खासदार संख्येवर समाधान मानावे लागेल.

पान १ व ४ वरुन...

## नुसता कागदाचा तुकडा देऊन पाठिंबा देणारे

प्रश्न उपस्थित केला जात आहे. कारण हे पत्र एक कागदाचा तुकडा असून हे हातभर असलं तरी फायद्याचं ठरतं नाही. पण सभागृहात चार शब्दही बोलले तर ते रेकॉर्डला येतात. यामुळे हे पत्र म्हणजे 'मैने तुम्हारी आंखे और आपने शुक्रिया बोलकर मेरे कान खुश किये' यापेक्षा दुसरे काही नाही.

कोर्टाने मान्य केलेले आरक्षण ही नसानसात जातीयवाद आणि रक्ताच्या थेंबाथेंबात मुस्लिम द्वेष भरलेल्या करंट्या भाजपा सरकारने मुस्लिमांचे शिक्षणातील ५ टक्के आरक्षण रद्द केले. यावर मात्र पाहिजे तसा रोष सभागृहात विरोधकांनी केला हे दिसून आले नाही. या सरकारी निर्णयाबाबत कोर्टाने सरकारला प्रश्न विचारले आहेत. पण त्याचे उत्तर अद्याप काही सरकारने दिल्याचे ऐकिवात नाही. मात्र या निर्णयाच्या निषेधार्थ पहिला मोर्चा बीड जिल्ह्यात निघत आहे. यासाठी सकल मुस्लिम समाज आरक्षण कृती समिती असे नाव देत मागून सप्तरंग प्रतिष्ठानचा टेकू आहे. या ऐतिहासिक एल्गार मोर्चाची महिनाभरापासून जोरदार तयारी सुरू आहे. जनतेतून यास मोठा पाठिंबा मिळत असून नावाप्रमाणेच हा ऐतिहासिक ठरणार असे दिसून येत आहे. ही वाहती गंगा पाहून राजकीय पुढाऱ्यांनी हात धुवून घेत मुस्लिमांची सहानुभूती मिळविण्यासाठी पाठिंबा जाहीर करण्याची जणू स्पर्धाच लागली होती. खा. बजरंग सोनवणे, आ.संदीप क्षीरसागर, आ. विजयसिंह पंडित, आ. प्रकाश सोळंके, आ. धनंजय मुंडे यांनी या मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला आहे. यासाठी या पाठिंबाकर्त्यांनी ही मागणी योग्य असल्याचे ठासून सांगितले आहे. पण सुज्ञ नागरिक मात्र आता मोर्चाला पाठिंबा देणारे खासदार, आमदार सभागृहात मुस्लिम आरक्षणावर बोलण्याची हिंमत दाखवणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कारण रस्त्यावरील चार तासाचे भाषण आणि हातभर लिहिलेले पत्र या केवळ भूस्कटात गोळ्या असून, मतदारांनी त्यांना ज्या सभागृहात पाठवले आहे. तेथे त्यांनी बोललेल्या चार शब्दांना मोठी किंमत आहे. जर खरंच खासदार आणि आमदारांनी मुस्लिम आरक्षण संदर्भात सभागृहात आवाज उठवला तर तेंव्हा हे खरे समाजाचे कैवारी ठरतील, नाही तर पत्र देणाऱ्यांची काही कमी नाही. तसेच समाजाने पत्रावर हुरळून न जाता आपल्या हक्कासाठी कोण लढतोय याची खात्री करुन निर्णय घ्यावा असा सल्ला बुद्धिजीवी वर्गातून केला जात आहे.

**पाठिंबा न देणाऱ्या पंकजा मुंडे यांचे बंधू धनंजय मुंडे यांचा पाठिंबा**

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना पराभूत केल्याने मुस्लिम समाजावर नाराज असलेले आ. धनंजय मुंडे यांनी मंत्री पंकजा मुंडे यांनी पाठिंबा जाहीर केला नसला तरी आणि त्यांनी मंत्री असतानाही मुस्लिम हितासाठी काही केल्याचे कुठं दिसत नाही तरीही मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला धनंजय मुंडे यांनी पाठिंबा दिला आहे. यामुळे याचीही दखल समाज घेणार असल्याचे चित्र आहे.

## आरक्षणाच्या मागणीसाठी

आणि सामाजिक संघटनांच्या नेते-कार्यकर्त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण दिले होते. मात्र, हे आरक्षण नंतर रद्द करण्यात आले. न्यायालयाने शिक्षणात आरक्षणासंदर्भात सकारात्मक भूमिका दर्शविली होती, परंतु त्यावर या सरकारने कुठलीच पावलं उचलली नाही, असा आरोप आयोजकांनी केला आहे. मुस्लिम समाज शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास असल्याचे सांगत, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण आवश्यक असल्याची भूमिका मोर्चा आयोजकांनी मांडली आहे. या मोर्चामध्ये केवळ शहरातीलच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील मुस्लिम समाज मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याने प्रशासनाकडूनही योग्य ती तयारी करण्यात येत आहे.

## आठवडाभरात विजेच्या मागणीत

मुंबईत तर अवघ्या आठवडाभरात वीजमागणीत १५ ते १७ टक्के इतकी वाढ नोंदवली गेली. उन्हाचा तडाखा कायम राहिल्यास विजेच्या मागणीत आणखी भर पडेल, असा अंदाज आहे.

यंदा मार्च-एप्रिलमध्ये पाऱ्याने मोठी उसळी घेतल्याने मुंबईसह राज्यात विजेचा वापर वाढून अनेक नवीन विक्रम प्रस्थापित झाले. मार्चमध्येच विजेची मागणी ३० हजार मेगावॉटच्या पुढे नोंदवली गेली. तर मुंबईची दिवसाची मागणी सुमारे साडेतीन ते चार हजार मेगावॉटपर्यंत पोहोचली होती. तापमान जसजसे उतरू लागले तशी वीजेची मागणीही कमी झाली. मात्र आठवडाभरात राज्यभर तापमानाने मोठी उसळी घेतल्याने विजेची मागणीही वाढली आहे.

मुंबईत ८ एप्रिलला सकाळच्या (दहा ते बारा वाजण्याच्या) सुमारास ३,४५९ मेगावॉट इतकी वीजमागणी होती. ती १५ एप्रिलला सुमारे १५ टक्क्यांनी (४,०६४ मेगावॉट) वाढली. सायंकाळपर्यंत वीजमागणीतील वाढ ५ ते ७ टक्क्यांपर्यंत खाली आली. मात्र पहाटे चारच्या सुमारास पुन्हा १७ टक्के इतकी वीजमागणी वाढ नोंदवली गेली.

राज्यात मुंबई वगळता इतरत्रही वीजमागणीत दिवसभरात ५ ते १० टक्के इतकी वृद्धी नोंदवली गेली. आठवडाभरापूर्वी राज्यभरात सकाळच्या सुमारास २२,९४२ मेगावॉट इतकी वीजमागणी होती. ती १५ एप्रिलला ४ टक्क्यांनी वाढून २३,९९२ मेगावॉटवर गेली. तर सायंकाळी पाचच्या सुमारास वीजमागणीतील वाढ पुन्हा १० टक्क्यांच्या आसपास नोंदवली गेली. यावेळेस दिवसभरातील सर्वाधिक म्हणजे २५,०१८ मेगावॉट इतकी वीजमागणी नोंदवली गेली. मागणी वाढली असली तरी भारनियमन कुठे करावे लागलेले नाही.

मुंबईत टाटा पॉवर, अदानी इलेक्ट्रिसिटी, आणि बेस्ट यांकडून प्रामुख्याने वीज पुरवठा केला जातो. तर उर्वरित महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून (महावितरण) वीज पुरवठा केला जातो. ग्रामीण भागात शेतीसाठी कृषीपंपांचा वापर वाढला आहे. या शिवाय वातानुकूलित यंत्रणा, कुलर, पंखे यांचाही वापर वाढतो. त्यामुळे ग्रामीण भागात महावितरणच्या विजेची मागणी वाढली आहे.

साधारण पाच वर्षांपूर्वी एप्रिल व मे महिन्यांत राज्यातील वीजमागणी २१ हजार मेगावॉटच्या आसपास सीमित असे. तर मुंबईत ती २,२०० मेगावॉटदरम्यान असे. त्यात आता विक्रमी वाढ झाली आहे. राज्यात विजेच्या मागणीने ३० हजार मेगावॉटचा विक्रम प्रस्थापित केला आहे. तर २२ मे, २०२४ रोजी मुंबईत ४,३०६ मेगावॉट इतकी विक्रमी वीजमागणी नोंदवली गेली. गेल्या वर्षी तर ती ४,४४० मेगावॉटवर पोहोचली होती.

## एलसीबीने राजुरीत छापा

करत होते. यावेळी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांना गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. नवगण राजुरी येथील सरकारी दवाखान्यासमोर असलेल्या एका दुकान गाळ्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपन्यांचा गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

मिळालेल्या माहितीची खातरजमा करून, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने पथकाने सकाळी १०.१५ वाजेच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत विकास महादेव टुले (वय ३० वर्षे, रा. नवगण राजुरी, ता.जि. बीड) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातील गाळ्यातून वेगवेगळ्या कंपन्यांचा एकूण २,४५,३२८/- रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

आरोपी विकास महादेव टुले याच्याविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोउपनि श्रीराम खटावकर, राहुल शिंदे, गोविंद राख, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, मनोज परजणे, अशफाक सय्यद आणि नितीन वडमारे यांचा समावेश होता.

## बनावट खरेदीखत असूनही

वापर करण्यात आल्याचे सर्व पुरावे उपलब्ध आहेत.

सदर प्रकरणात भारतीय दंड संहितेतील कलम ४२० (फसवणूक), ४६७, ४६८, ४७१ (बनावट कागदपत्रे तयार करणे व वापरणे), ४०६ (विश्वासघात) तसेच १२०-ब (गुन्हेगारी कट) यांसारखे गंभीर गुन्हे लागू होत असूनही, शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडून अद्याप कोणतीही नोंदविण्यात आलेली नाही. शेख आकबर यांनी सांगितले की, त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, उपनिबंधक कार्यालय तसेच न्यायालयातही अर्ज सादर केले आहेत. प्लॉट खरेदी घेणार विक्रम काटे यानेही खरेदीखत बनावट असल्याचे व वरील भुमाफियामार्फत त्याची फसवणूक झाल्याचे न्यायाल्यासमोर मान्य केले आहे मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नसल्यामुळे त्यांना न्याय मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या प्रकरणात संबंधित आरोपींना राजकीय किंवा आर्थिक पाठबळ असल्याचा व पोलिसांसोबत त्यांचे आर्थिक संबंध असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे. पोलीस अधीक्षकांची याबाबत भेट घेतली असता त्यांनी बांगर साहेबाना कॉल केला असता अकबर याने आरोपीकडून पैसे घेऊन मिटून घेतले असा खोटा आरोप बांगर साहेबांकडून कडून अकबर यांच्यावर लावला तसेच साहेबांची दिशाभूल केली यावरून ''पोलीस मुद्दाम कारवाई टाळत आहेत का? आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे का?'' असे प्रश्न नागरिकांमध्ये चर्चिले जात आहेत. तक्रारदार शेख आकबर यांनी इशारा दिला आहे की, लवकरात लवकर गुन्हा दाखल करून दोषींवर कारवाई झाली नाही तर ते आमरण उपोषणास बसणार आहेत. दरम्यान, या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

## कबाडगल्ली येथील

शहर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध परस्पर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, हा वाद स्थानिक पातळीवर मिटणारा असताना त्याला राजकीय स्वरुप देऊन जातीय रंग देत अनावश्यक प्रसिद्धी दिली जात असल्याचे सर्वपक्षीय संघटनाच्या शिष्टमंडळाने व्यक्त केले.

विविध पक्ष व संघटनांच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.१६) पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेतली. यावेळी कब्बाडगल्ली येथील प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न होत असून पोलीस प्रशासनाने निष्पक्ष कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. सदरील प्रकरणामुळे कब्बाडगल्लीसह जिल्ह्याची आणि पोलीस प्रशासनाचीही बदनामी होत असल्याचे म्हटले आहे. दिलेल्या या निवेदनावर मराठा सेवक गंगाधर काळकुटे शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत नवले, जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे,अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन, संघटनेचेसंभाजी ब्रिगेडचे शरद चव्हाण,शिवसेना तालुकाध्यक्ष संतोष जाधव, मराठा आरक्षण कृतीसमीतीचे जयमल्हार बागल, काळकुटे, प्रा.किशोर काळे,जिजाऊ प्रतिष्ठान चे इंजि देवीसिह शिंदे, विनोद काळे,मंगेश काळे,भिमराव दळवी आदींच्या स्वाक्षरी आहेत.

**वैयक्तिक वादाला राजकीय रंग कशासाठी?- प्रा.किशोर काळे**

प्रभागात विविध समाजातील नागरिक राहत असून हा केवळ कचरा व पाणी समस्येवरून झालेला वाद आहे. मात्र काहीजण स्वतःच्या फायद्यासाठी त्याला जातीय रंग देत असल्याचा आरोप प्रा. किशोर काळे यांनी केला. तसेच मी सुद्धा ब्राम्हण समाजाचा असून माझ्यावरील याच लोकांनी हल्ला केला होता, तेव्हा जात कुठे गेली होती? असाही सवाल त्यांनी उपस्थित केला.

**वाद वाढवू नका, सामोपचाराने तोडगा काढा -चंद्रकांत नवले**

आज विविध संघटना एकत्र येऊन वाद मिटवण्याचा प्रयत्न करत आहोत. दोन्ही बाजूंनी संयम ठेवून चर्चा करुन विषय मार्गी लावावा. कारण क्षीरसागरांचे कामच वाद पेटवणे, भांडण लावणे असे आहे. या प्रकाराला कुणीही बळी पडू नये, आंदोलनाची भाषा केल्यास आम्हालाही आंदोलन करावे लागेल असे शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत नवले यांनी म्हटले.

**आंदोलनाच्या भाषेत दबाव टाकू नये-गंगाधर काळकुटे**

जाधव व देशपांडे यांचा गल्लीतील किरकोळ वाद आहे. याप्रकरणी बीड शहर पोलीसांनी दोघांवरही कार्यवाही केलेली आहे. मात्र या प्रकरणाला जातीय व राजकीय वळण देऊ नये. तसेच डॉ.योगेश क्षीरसागरांनी आंदोलनाचा इशारा दिला. हा एक प्रकारे पोलीस प्रशानावर दबाव टकाण्याचा प्रयत्न आहे. असा दबाव न टकाता सामोपचाराचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहनही मराठा सेवक गंगधार काळकुटे यांनी केले आहे.

## ग्रामीण पोलीसांची ट्रॅव्हल्स्वाल्यांकडून

दाखवत ग्रामीण पोलीस ठाण्याकडून जबरदस्ती वसुली सुरू असल्याचा आरोप वाहनचालकांनी केला आहे. ''वरिष्ठांचा आदेश आहे'' असे सांगून संबंधितांकडून पैसे उकळले जात असल्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. यामुळे ट्रॅव्हल्स व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची तयारी दर्शवली आहे. जर हा प्रकार खरा ठरला, तर संबंधित पोलीसांवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणावर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पाटोद्याची दरिद्री कधी मिटणार?

उपाययोजना केल्या जात आहेत, मात्र कायमस्वरूपी दुरुस्ती किंवा नव्याने बांधकामाचा कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही.दुसरीकडे, हिंदू स्मशानभूमीकडे जाणाऱ्या साळ नदीवरील पूल तुटलेल्या अवस्थेत असल्यामुळे नागरिकांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. अंत्यसंस्कारासाठी जाणाऱ्या लोकांना पर्यायी मार्ग शोधावे लागत आहेत, जे वेळखाऊ आणि कष्टदायक आहेत. अशा संवेदनशील ठिकाणाच्या समस्येकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाल्या आहेत.याशिवाय, मांजरा नदीवरील ब्रिज-कम-बंधाऱ्याचे काम अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. या प्रकल्पामुळे पाणी साठवण, शेतीला पाणीपुरवठा आणि बाजार समिती कडे जाणारी स्थानिक वाहतूक व्यवस्था सुधारण्याची अपेक्षा होती. मात्र काम बंध असल्यामुळे या सर्व अपेक्षा धुळीस मिळाल्या आहेत. प्रशासन व सरकारच्या उदासीनता यामुळे हा प्रकल्प आजही अपूर्ण अवस्थेतच आहे.पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी वेळोवेळी आंदोलन, निवेदने आणि मागण्या करूनही या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाटोद्याचे हे लहान पण महत्त्वाचे प्रश्न का सुटत नाहीत?'' असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.दरम्यान, पावसाळा जवळ येत असल्यामुळे या पुलांची स्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. वेळेत दुरुस्ती न झाल्यास मोठा अपघात किंवा जीवितहानी होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासन व सरकारने तात्काळ लक्ष घालून या तिन्ही पुलांच्या कामांना गती देणे आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांना

घर ४५० चौरस फुटांपर्यंत करण्यात आले आहे. यामध्ये देवघरापासून ते कार्यालय कक्ष, प्रवेशद्वार कक्षांचाही समावेश करण्यात आला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी विविध वेतनगटांनुसार शासकीय कर्मचारी निवासस्थानांचे चटईक्षेत्रफळ २००४ साली निश्चित करण्यात आले होते. मात्र मागील २२ वर्षांत राहणीमानात झालेले बदल, वाढलेल्या गरजा, जीवनमानातील बदल तसेच नवीन बांधकाम तंत्रज्ञान या सर्वांचा विचार करून या घरांच्या संरचनेत बदल करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडून घेण्यात आला.

त्यानुसार या घरांची संरचना आणि क्षेत्रफळ ठरविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने सातव्या वेतन आयोगानुसार विविध वेतनगटांनुसार घरांची संरचाना आणि क्षेत्रफळ निश्चित केले आहे. सध्या असलेली शासकीय निवासस्थाने १८०० चौरस फुटांपासून ते ३४० चौरस फुट क्षेत्रफळापर्यंत मर्यादित आहेत. मात्र नवीन घरांचे क्षेत्रफळ हे २४०० चौरस फुटांपासून ४५० चौरस फुटांपर्यंत वाढविण्यात आले आहे.

वेतनगट एस-३१ २४०० चौरस फूट चटई क्षेत्र, एस-२७ ते एस-३० २००० चौरस फूट, एस-१९ ते एस-२६ १६०० चौरस फूट, एस-१३ ते एस-१८ १००० चौरस फूट, एस-९ ते एस-१२ ७०० चौरस फूट, एस-५ ते एस-८ ६०० चौरस फूट, एस-१ ते एस- ४ या वेतनगटाला ४५० चौरस फूट चटई क्षेत्रफळाचे घर उपलब्ध होणार आहे.

हा निर्णय भविष्यात करण्यात येणाऱ्या नवीन शासकीय निवासस्थानांच्या बांधकामांसाठी लागू करण्यात आला आहे. यापूर्वी वाटप करण्यात आलेली शासकीय निवासस्थाने तसचे सद्यस्थितीत बांधकामाधीन असलेली शासकीय निवासस्ताने यांच्या संभाव्य वाटपात कोणतेही बदल करण्यात आलेले नसल्याचे याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काढण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. २३ फेब्रुवारी रोजी उच्चस्तरीय सचिव समितीने या निर्णयाला मान्यता दिली.

## आजच्या आरक्षण मोर्चात

आहे.

या मोर्चाची सुरुवात बीड शहरातील जामा जामा मस्जिदपासून करण्यात येणार , शिक्षण, नोकरी आणि सामाजिक प्रगतीसाठी आरक्षण अत्यंत आवश्यक असून, राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे मुस्लिम समाजाच्या भविष्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे आपल्या हक्कासाठी एकजुटीने लढा देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी बैठका घेऊन जनजागृती करण्यात येत असून, युवक, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्व स्तरातील नागरिकांनी मोर्चात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही मौलाना आझाद युवा मंचचे अध्यक्ष खलील अहेमद व सचिव सय्यद आबेद यांनी नमूद केले आहे.

## हक्कासाठी बीडमध्ये आज

मागण्या ठळकपणे मांडणे आणि प्रशासनाचे लक्ष वेधणे हा आहे. शहरात या मोर्च्याबाबत उत्सुकता असून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे, मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनची संपूर्ण टीम या मोर्च्यात सहभागी राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा

**खेळाडूंना किटचे वाटप**

संघातील निवड झालेल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंप्रमाणे व्हाईट किट व ट्रॅव्हलिंग किट देण्यात आले. हे किट एडीएफसी क्रिकेट क्लब व युनिक स्पोर्ट्स यांच्या सौजन्याने उपलब्ध करून देण्यात आले. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व पदाधिकारी व पालकांनी कौतुक केले.

**मान्यवरांची उपस्थिती**

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव डॉ. आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, जावेद पाशा, मनोज जोगदंड, रिजवान खान,एडीएफसी क्रिकेट क्लबचे राजेश जाधव, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखुदे, मेनकुदुळे सर, अतिक कुरेशी, अक्षय नरवडे व पठाण शाहरुख आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी सर्व निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा देत, स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उज्वल करण्याचे आवाहन केले.

## बीड मधील जयंती

आपली जबाबदारी चोखपणे पार पाडणे आवश्यक होते. मात्र सदरील प्रकरणातून संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचार्यांचा अक्षम्य दुर्लक्षपणा दिसुन येत असल्याने या प्रकरणी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर सदरील प्रकरणाचे गांभीर्य पाहता स्वच्छता विभागातील गणेश पगारे, पाणी पुरवठा विभागातील माने आणि बांधकाम विभागाचे इंजि.किरण देशमुख यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. चौकशीमध्ये जे कोणी अधिकारी, कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्याविरूध्द थेट निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला.

## रस्ता दुरुस्तीप्रश्नी रखरखत्या उन्हात युवकांचे

महामार्गाची अतिवृष्टीमुळे चाळणी होऊन या मार्गावरील पूल देखील खचले गेले आहेत. आरोग्य, शिक्षण, व्यापार आदी विविध कारणाने या मार्गावरुन हजारो नागरिकांची वर्दळ असताना जीव मुठीत घेऊन या मार्गावर प्रवास करावा लागत असून मागील ३ वर्षापासून अनेक वेळा प्रयत्न करून ही आश्वासन शिवाय काहीच पदरी पडत नसल्याने मोहा गाव परिसरातील शेकडो विद्यार्थी, युवकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई येथे दि २० जानेवारी रोजी ठिय्या करत तीव्र निदर्शने केली. युवकांची आक्रमकता आणि प्रशांचे गांभीर्य पाहता या रस्त्याचे अद्यावतीकरण करण्याचे कार्य आदेश बांधकाम विभागाने पारित केल्याने ही निदर्शने स्थगित करण्यात आली आहेत. आदेश पारित होऊन ही २-३ महिन्याचा काळ लोटला असून ही रस्त्याचे काम प्रलंबित असल्याने भारतीय लोकशाहीवादी युवा संघटना (डीवायएफआय) च्या नेतृत्वाखाली परिसरातील गावातील युवकांनी गुरुवार दि १६ पासून दोन्ही मार्गाला जोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज चौक म्हातारगाव फाटा कांनापूर ता-धारूर या ठिकाणी रखरखत्या उन्हात बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले असून मागणी लवकरात लवकर न सोडविल्यास या पेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी

संघटनेचे विशाल देशमुख, सुदाम शिंदे, प्रवीण देशमुख, विष्णुपंत देशमुख, सुनील शिंदे, परळी तालुकाध्यक्ष विजय घुगे, सिद्राम सोळंके यांच्यासह उपस्थित युवकांनी दिला आहे.

## आष्टी नगरपंचायत नगर अभियंता अथहर बेग

जमरात ब्रिज येथे रमी जमारात (प्रतीकात्मक दगड मारणे) यांसारखे विविध धार्मिक विधी पार पाडले जातात. याशिवाय कुर्बानी देणे आणि केस कापणे किंवा मुंडण करणे या विधींचाही समावेश असतो.

हज यात्रेमुळे आत्मशुद्धीची भावना दृढ होते, समानतेचा संदेश मिळतो, तसेच संयम, शिस्त आणि अल्लाहप्रती भक्ती वाढीस लागते, असे मानले जाते. भारतातूनही दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक हज कमिटी ऑफ इंडिया मार्फत हज यात्रेसाठी जातात.

यावेळी नगराध्यक्ष जिया बेग,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,जि.प.सदस्य माऊली जरांगे, भाजपा विधानसभा अध्यक्ष गणेश शिंदे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,नगरसेवक सुरेश वारंगुळे,इर्शान खान, अक्षय धोंडे,भारत मुरकुटे,बाळासाहेब घोडके,ज्ञानदेव राऊत, पत्रकार सचिन रानडे,पत्रकार प्रविण पोकळे, पत्रकार जावेद पठाण ,समीर शेख,डॉ.सिद्दीक बेग,इंजि.गहिनीनाथ शिरसाट,लेखापाल जीवन साठे, सोमनाथ साखरे, आदींनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## शहरातील ओपन स्पेसचे व्यवस्थापन,

जेणेकरून त्या जागेचे संरक्षण होईल आणि अतिक्रमणाला आळा बसेल. यामुळे शहराच्या नियोजनात शिस्त राहून नागरिकांना सुरक्षित मोकळी जागा उपलब्ध होईल. तसेच, शहरातील गायरान जमिनींवर घरकुलांसाठी भूखंड वाटप करताना प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. गायरान जमिनींचे वाटप करताना नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य करावे, अशी सखोल मागणी नगरसेवक मंगेश धोंगडे यांच्या वतीने करण्यात आली आहे. या तिन्ही मागण्यांची अंमलबजावणी झाल्यास शहरातील नियोजन, पारदर्शकता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, बीड नगरपरिषद प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## आजच्या आरक्षण मोर्चात मोठ्या

आहेत. त्यामुळे आपल्या मुला-बाळांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा लढा आवश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, आज जर आपण एकजुटीने उभे राहिलो नाही तर येणाऱ्या काळात आपल्या पुढील पिढ्यांना संधींपासून वंचित राहावे लागू शकते. म्हणून प्रत्येक तरुण, ज्येष्ठ नागरिक, महिला व समाजातील सर्व घटकांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून या मोर्चात सहभागी व्हावे. ही वेळ एकत्र येण्याची आहे, मतभेद विसरून समाजहितासाठी खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची आहे. आपल्या हक्कासाठी शांततेच्या मार्गाने आवाज उठविणे हीच खरी ताकद आहे, असेही त्यांनी सांगितले. १७ एप्रिल रोजी बीड येथे होणारा मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चा यशस्वी करून मुस्लिम समाजाची एकजूट राज्याला दाखवून द्यावी, असे आवाहनही हाफेज मन्सुर तय्यिबी यांनी शेवटी केले.

## डोंगरातील सीताफळ ते

ग्राम ऊर्जा फाउंडेशनच्या शिक्षण, रोजगार आणि शासकीय योजनांवरील प्रकल्पांचा अभ्यास करून तिने रोजगारनिर्मिती उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः सीताफळ प्रक्रिया प्रकल्पात आधुनिकता, गुणवत्ता आणि शाश्वतता आणण्यासाठी तिने मोलाचे योगदान दिले. दगडवाडी, मंगईवाडी, पोलेवाडी, कुरणवाडी या भागांतील महिलांशी समन्वय साधत त्यांचा आत्मविश्वास वाढवला.

तीन दिवसांत खराब होणाऱ्या सीताफळाचे दीर्घकाळ साठवण आणि मूल्यवर्धन कसे करता येईल, याबाबत तिने मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्राच्या सहकार्याने महिलांना प्रक्रिया, साठवण आणि विक्री व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले. सीताफळ ते कुल्फी व रबडी हा संपूर्ण प्रवास महिलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकवण्यात आला. तिच्या मार्गदर्शनाखाली सृजन ग्रोटेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या माध्यमातून सीताफळ प्रक्रिया युनिट उभारण्यात आले. या हंगामात ५ टनांहून अधिक सीताफळ प्रक्रिया करण्यात आली, तर सुमारे २ टन सीताफळ विजयवाडा येथे विक्रीसाठी पाठवण्यात आले. पूर्वी कमी दरात विकले जाणारे सीताफळ आता इतर राज्यांत चांगल्या किमतीत विकले जाऊ लागले आहे.

प्रक्रिया युनिट उभारताना व्यापाऱ्यांशी मतभेद, यंत्रसामग्रीची देखभाल आणि व्यवस्थापनातील अडचणी अशा अनेक आव्हानांवर मात करत तिने स्वच्छता आणि कोल्डचेन व्यवस्थापनावर विशेष भर दिला. कोणतेही प्रिझर्वेटिव्ह न वापरता सुमारे ५ टन सीताफळ पल्प तयार करण्यात यश आले.या पल्पपासून 'जोगाई सीताफळ कुल्फी' व रबडीसारखी उत्पादने विकसित करण्यात आली असून, हैदराबाद, पुणे आणि लातूरसारख्या शहरांत या उत्पादनांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमातून १२५ महिलांना रोजगार मिळाला असून, सुमारे १५ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. अनेक महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

भाषा आणि प्रदेशाच्या मर्यादा ओलांडून स्तुती गुप्ता यांनी मराठवाड्यातील महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा दिली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत दिल्ली येथे त्यांना एक लाख रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले आहे. डोंगरातील सीताफळाचे मूल्यवर्धन करून शाश्वत रोजगारनिर्मितीचा आदर्श उभा करणारा हा उपक्रम ग्राम ऊर्जा फाउंडेशनसाठी तसेच मराठवाड्यातील ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# आ.सुरेश धस यांच्या हस्ते ट्रॅक्टर व कृषी औजारांचे वितरण

**आष्टी । सत्यवादी**

आ. सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी तहसील कार्यालय, आष्टी येथे खरीप हंगाम २०२६ पूर्व नियोजन बैठक उत्साहात पार पडली. आगामी हंगामाच्या अनुषंगाने शेती क्षेत्रातील विविध योजना, आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीदरम्यान कृषी विभागाच्या उइढ (उळीशलीं इशपशषळीं ढीरपीषशी) पोर्टल अंतर्गत शेतकरी बांधवांना अनुदान योजनांमधून ट्रॅक्टर तसेच विविध आधुनिक कृषी अवजारांचे वितरण आ.सुरेश धस यांच्या हस्ते करण्यात आले.आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती अधिक सक्षम व उत्पादनक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा उपक्रम ठरला.



तसेच गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत दुर्दैवी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदानाचे हमीपत्र देखील देण्यात आले. या माध्यमातून संकटकाळात कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

यावेळी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब, उपविभागीय महसूल अधिकारी श्रीमती कविता जाधव, श्रीमती वसीमा शेख, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, शेळके साहेब, गांगर्डे साहेब, कृषी विस्तार अधिकारी, कृषी सेवा केंद्रांचे विक्रेते तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनी विविध समस्यांवर मते मांडली असून प्रशासनाकडून त्या सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. खरीप हंगाम सुरळीत व यशस्वी पार पाडण्यासाठी प्रशासन व कृषी विभाग सज्ज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# बीड जिल्ह्यात १७७३ रुग्णांना सुमारे १३.६९ कोटीची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती



**बीड । सत्यवादी**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. बीड जिल्ह्यात आर्थिक वर्षात १७७३ रुग्णांना सुमारे १३ कोटी ६९ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

### २० गंभीर आजारासाठी मदत

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

# सगरोळीच्या प्रमोद देशमुख यांना 'उत्कृष्ट माजी विद्यार्थी' पुरस्कार; पुण्यात कृषी मंत्र्यांकडून गौरव

**नांदेड । सत्यवादी**

माजी विद्यार्थी संघटना, शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे यांच्यावतीने दरवर्षी दिला जाणारा यंदाचा उत्कृष्ट माजी विद्यार्थी पुरस्कार सगरोळी ता. बिलोली येथील संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख यांना जाहीर झाला असून, सोमवारी ता. १३ रोजी पुणे येथे महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

समाजकार्यासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. माजी विद्यार्थी संघटना, शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे यांच्या ३८ व्या वर्धापन दिनानिमित्त



महाविद्यालयाच्या डॉ. शिरनामे सभागृहात आयोजित कार्यक्रमात देशमुख यांचा गौरव करण्यात आला. प्रमोद देशमुख हे शिक्षण, कृषी, पर्यावरण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. मागील १५ वर्षांपासून कृषि विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने नांदेड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक कृषी तंत्रज्ञान पोहोचवून उत्पादनवाढीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संस्थेमार्फत त्यांच्या नेतृत्वाखाली सेंद्रिय शेतीतील उल्लेखनीय कार्य व विशेषतः नांदेड जिल्ह्यात जलसंधारण उपक्रमांमुळे अनेक दुष्काळग्रस्त गावे टँकरमुक्त होऊन जलसमृद्ध झाली आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच त्यांना 'राज्यस्तरीय जलनायक' हा बहुमान प्रदान केला आहे.

# दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांची महादेव चांगिरे यांनी घेतली सदिच्छा भेट

## दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

**परळी । सत्यवादी**

क्रांतिकारी लाईन स्टाफ सेना, पुणे झोन यांच्या वतीने महाराष्ट्र दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. या भेटीचे नेतृत्व रास्ता पेठ सर्कल सचिव महादेव चांगिरे यांनी केले.

दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांची क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेच्या वतीने सचिव महादेव चांगिरे सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान महावितरणमधील दिव्यांग कर्मचारी बांधवांच्या विविध अडचणी, शासकीय योजनांचा लाभ, उपलब्ध सवलती तसेच भविष्यात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी उपक्रमांबाबत सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी महादेव चांगिरे यांनी लाईन स्टाफ कर्मचारी बांधवांची जबाबदारी अधोरेखित करत सांगितले की, वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अनेक कर्मचारी पावसात, वादळात तसेच आपत्कालीन परिस्थितीतही अखंड सेवा बजावत असतात. सेवेदरम्यान काही कर्मचाऱ्यांना अपघातामुळे शारीरिक दिव्यांगत्वाला सामोरे जावे लागते, अशा कर्मचारी बांधवांना आवश्यक कागदपत्रे, अपंगत्व दिव्यांग प्रमाणपत्र, शासकीय योजना आणि मार्गदर्शन सुलभपणे मिळावे, यासाठी विशेष सहकार्याची विनंती करण्यात आली. डॉ. संतोष मुंडे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सांगितले की, सेवेदरम्यान दिव्यांगत्व आलेल्या कोणत्याही कर्मचारी



बांधवाला अपंगत्व प्रमाणपत्र, शासकीय योजना किंवा आवश्यक मदतीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. अशा कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी आपण सदैव तत्पर राहू, असे त्यांनी नमूद केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये महामानवास जयंतीनिमित्त अभिवादन



**बीड । सत्यवादी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदे पंडित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच शाळेतील शिक्षक एस.बी.मेश्राम, यु.बी.पवळ, आर.बी.घुले यांनी ही विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेबांच्या जीवनाविषयी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे संचालन यु.बी.पवळ, प्रास्ताविक श्रीमती एन.जी.मुंडे आणि आभार प्रदर्शन डब्ल्यु.एस.वाघमारे, यांनी केले. याप्रसंगी आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे, से.नि.शिक्षक विजय देशमुख व शिक्षकेतर कर्मचारी सुभाष गायकवाड, एल.बी.हजारे, भारत कोळेकर, श्रीमती नेहा गायकवाड, यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते.

# आरक्षण मोर्चात बहुसंख्येने सहभागी व्हा–सद्दाम पठाण

**वडवणी । सत्यवादी**

बीड मुस्लिम समाजासाठी रद्द करण्यात आलेल्या पाच टक्के आरक्षणाच्या पुनर्स्थापनेसाठी येत्या १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य एल्गार मोर्चामध्ये बीड जिल्ह्यातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल मुस्लिम युवक बीड जिल्हाध्यक्ष सद्दाम पठाण यांनी केली आहे. या मोर्चाची सुरुवात बीड शहरातील जामा जामा मस्जिदपासून करण्यात येणार , शिक्षण, नोकरी आणि सामाजिक प्रगतीसाठी आरक्षण अत्यंत आवश्यक असून, राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे मुस्लिम समाजाच्या भविष्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे आपल्या हक्कासाठी एकजुटीने लढा देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी बैठका घेऊन जनजागृती करण्यात येत असून, युवक, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्व स्तरातील नागरिकांनी मोर्चात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान जि आहे.



# पारवेताईंची पगारे, माने, देशमुख यांना नोटीस; मुख्याधिकारी फडसे यांना बगल का?

## मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी उपस्थित केला प्रश्न

**बीड । सत्यवादी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने बीड नगर परिषदेने शहरात हैदोस घातल्यानंतर प्रसिद्धी माध्यमातून याची मोठ्या प्रमाणात चिरफाड करण्यात आली, त्यानंतर नगराध्यक्ष प्रेमलता पारवे ताई यांनी बैठक घेऊन नगरपरिषदेतील पगारे, माने आणि देशमुख यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. समाधानकारक उत्तर न दिल्यास निलंबनाची कारवाई करण्याचेही म्हटले. मात्र मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना का बगल देण्यात आली? असा प्रश्न यानिमित्ताने मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी उपस्थित केला आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, त्यांच्या या पावलामुळे तत्कालीन कायमस्वरूपी नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी निलावाड या तत्कालीन जोडीची आठवण आली. ही जोडी ही एक दुसऱ्यांना अशी काही सांभाळून घेत होती की, एक दुसऱ्याला सांभाळून घेण्याच्या नादात त्यांनी बीड शहराची पूर्णतः वाट लावून टाकली होती. याचेच फळ म्हणून आज बीड शहराची जी काही दुर्दशा आहे त्यात या जोडीचा खूप मोठा हात आहे. बीड नगर परिषदेत पारवे ताई यांच्या रूपात प्रथमच एक भीम कन्या नगराध्यक्ष पदावर विराजमान झाल्याचा अभिमान बीड शहरवासियांना निश्चितपणे झालेला आहे. परंतु दुर्दैव आहे की, याच भीम कन्येच्या कार्यकाळात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्याच जयंतीला रस्त्यांवर खडी टाकून, पुन्हा ती उचलून, रस्त्यांवर चिखल होईपर्यंत पाणी मारून बीड नगर परिषदेने असे काही गालबोट लावले की सगळीकडे थू-थू व्हायला लागली आहे. निदान याचे भान ठेवून तरी कारवाई व्हायला हवी.




# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या न.प.अधिकाऱ्यांना निलंबित करा-पप्पू कागदे

**बीड । सत्यवादी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती घाण पाणी सोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर चर,खडी टाकून अनेक आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बीड नगर परिषद बांधकाम अभियंता किरण देशमुख व पाणीपुरवठा अभियंता प्रमोद माने यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अशी मागणी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देऊन केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती बारीक चर,खडी टाकून घाण पाणी सोडल्यामुळे खडीवरून घसरून अनेक महिला भगिनी, पुरुष व रिपाइंचे बीड शहराध्यक्ष अविनाश जोगदंड जबर जखमी झाले आहेत. ही बाब अत्यंत खेदजनक असून जयंती उत्सवाला गालबोट लावणारी आहे. आंबेडकरांच्या मिरवणुकी दरम्यान रस्त्यावर घाण पाणी सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान



करणाऱ्या व रस्त्यावर बारीक चर,खडी टाकून आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बांधकाम अभियंता किरण देशमुख, पाणी पुरवठा अभियंता प्रमोद माने व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. नसता बीड शहर रिपाइंच्या वतीने बीड नगर परिषदवर सोमवार दि. २० एप्रिल २०२६ रोजी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, कपिल साळवे, विष्णू जोगदंड, तुषार जाधव, सिद्धिक फारोखी, के.के.कांबळे, भैय्यासाहेब वाघमारे आदींनी केले.

# बीड मधील जयंती उत्सव मिरवणूकीतील गैरसोय प्रकरणी नगराध्यक्षांनी दिले चौकशीचे आदेश

## पगारे, माने, किरण देशमुख यांना बजावली नोटीस; दोषींवर होणार निलंबनाची कारवाई

**बीड । सत्यवादी**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव मिरवणूकीदरम्यान झालेल्या गैरसोयी प्रकरणी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. आज दुपारी नगर पालिकेत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून स्वच्छता विभागातील गणेश पगारे, पाणी पुरवठ्याचे माने आणि बांधकाम विभागातील इंजि.किरण देशमुख यांना नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणात जो कोणी दोषी आढळेल



त्यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी सांगितले.

बीड नगर पालिकेत आज दुपारी झालेल्या बैठकीस नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यासह स्वच्छता सभापती शेख निजाम, नगरसेवक शेख बिलाल, रंजित बनसोडे, भैय्या मोरे, प्रमोद शिंदे, मनोज गोडसे आदिंची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये जयंती उत्सव मिरवणूकीदरम्यान झालेल्या गैरसोयीबद्दल चर्चा करण्यात आली. जयंती उत्सवाच्या अनुषंगाने संबंधित विभागाने

(पान २ वर...)

# हक्कासाठी बीडमध्ये आज जनसागर उसळणार!

## मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनकडून नागरिकांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

**बीड । सत्यवादी**

मुस्लिम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर आज बीड शहरात मुस्लिम आरक्षणाच्या मागण्यांसाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा दुपारी २ वाजता किल्ला मैदान येथून सुरू होऊन जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जाणार आहे. या मोर्चाचे आयोजन मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने करण्यात आले असून, मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अरफात खान आणि संस्थापक सचिव सय्यद सलमान यांनी नागरिकांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहून हा मोर्चा यशस्वी करावा, असे सांगितले आहे. आयोजकांच्या मते, या मोर्च्याचा उद्देश मुस्लिम समाजाच्या आरक्षणासंदर्भातील

(पान २ वर...)

# आष्टी नगरपंचायत नगर अभियंता अथहर बेग पवित्र हज यात्रेसाठी रवाना



**आष्टी। सत्यवादी**

येथील नगरपंचायत कार्यालयात कार्यरत असलेले नगर अभियंता मिर्झा अथहर इनायतुल्ला बेग हे पवित्र हज यात्रेसाठी काल रवाना झाले. सुमारे ४५ दिवसांच्या या यात्रेदरम्यान ते इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र तीर्थस्थळे असलेल्या मक्का आणि मदीना येथे जाऊन धार्मिक विधी पार पाडणार आहेत.

हज यात्रा ही इस्लाम धर्मातील पाचवा स्तंभ मानली जाते. शारीरिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या प्रत्येक मुस्लिमाने आयुष्यात किमान एकदा हज करणे आवश्यक मानले जाते. इस्लामी दिनदर्शिकेनुसार जिलहज्ज महिन्यात ही यात्रा पार पडते आणि जगभरातील लाखो मुस्लिम सौदी अरेबिया येथे एकत्र येऊन श्रद्धाभावाने हज करतात.

हज यात्रेमध्ये एहराम धारण करणे, काबा भोवती तवाफ (सात फेऱ्या) मारणे, सफा आणि मरवा टेकड्या दरम्यान सई करणे, अराफात पर्वत येथे प्रार्थना करणे, मुजदलिफा येथे मुक्काम, तसेच

(पान २ वर...)

# मुस्लिम आरक्षण मोर्चाला संभाजी ब्रिगेडचा पाठिंबा

**बीड । सत्यवादी**

मुस्लिम समाजाला शिक्षण आणि नोकरीत आरक्षण मिळावे या मागणीसाठी १७ एप्रिल रोजी बीड शहरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला संभाजी ब्रिगेड, बीड जिल्ह्याच्या वतीने अधिकृतपणे जाहीर पाठिंबा घोषित करण्यात आला आहे. संभाजी ब्रिगेडने नेहमीच बहुजन आणि अल्पसंख्याक समाजाच्या न्याय्य हक्कासाठी भूमिका घेतली आहे. मुस्लिम समाजातील तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सक्रिय सहभागी होऊन आपला पाठिंबा दर्शवतील, असे जिल्हा शाखेच्या वतीने कळवण्यात आले आहे.

# शहरातील ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकामासह गायरान जमिनींचे तात्काळ नियोजन करा

## नगरसेवक मंगेश धोंगडे यांची न.प. प्रशासनाकडे आक्रमक मागणी

**बीड । सत्यवादी**

शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भाजपच्या गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मंगेश धोंगडे यांनी बीड नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकाम तसेच गायरान जमिनींच्या नियोजनाचा समावेश आहे.



निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील प्रत्येक वॉर्डमधील ओपन स्पेसची स्वतंत्र नोंद ठेवून त्याची माहिती संबंधित नगरसेवकांना देण्यात यावी. या जागांवर अतिक्रमण होऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांच्या हितासाठी या मोकळ्या जागांचा योग्य व नियोजनबद्ध वापर व्हावा, यावर भर देण्यात येईल. याशिवाय, शहरातील प्रत्येक ओपन स्पेसभोवती कंपाउंड उभारण्यात यावे,

(पान २ वर...)

# डोंगरातील सीताफळ ते ‘जोगाई कुल्फी’ एका फेलोची प्रेरणादायी ग्रामीण परिवर्तन कथा



**धारूर। सत्यवादी**

ग्रामीण भागातील विकासाला नवी दिशा देण्यासाठी विविध राज्यांतील तरुण-तरुणी पुढे येत असून, अशाच एका तरुणीने डोंगरपट्ट्यातील सीताफळाला मूल्यवर्धन करून ‘जोगाई सीताफळ कुल्फी’सारखा ब्रँड उभा करत ग्रामीण महिलांसाठी रोजगाराची नवी दारे खुली केली आहेत. ग्राम ऊर्जा फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ‘स्वर फेलोशिप प्रोग्राम’ अंतर्गत हे परिवर्तन शक्य झाले आहे.

ळतेर्श्रीपींशशी, पुणे यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या फेलोशिपच्या माध्यमातून मध्यप्रदेशातील २२ वर्षीय स्तुती गुप्ता गेल्या वर्षभरापासून बीड जिल्ह्यात कार्यरत आहे. बी.एस्सी. शिक्षण पूर्ण करून यूपीएससीची तयारी करणाऱ्या स्तुतीने सुरुवातीला ग्रामीण प्रश्नांविषयी अनभिज्ञ असतानाही बदल घडवण्याच्या जिद्दीने अंबेजोगाई तालुक्यातील डोंगररांगांमध्ये काम सुरू केले.

(पान २ वर...)

# बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा अंडर १६ संघ बिडकीनकडे रवाना

## एडीएफसी क्रिकेट क्लब व युनिक स्पोर्टसकडून खेळाडूंना किटचे वाटप



**बीड । सत्यवादी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित निमंत्रित स्पर्धेसाठी बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा अंडर-१६ संघ आज बिडकीनकडे रवाना झाला. येथून संघाला उत्साहपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.

ही स्पर्धा पुढील १५ दिवस चालणार असून प्रत्येक संघाला पाच सामने खेळण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेत बीड जिल्ह्याचा संघ चांगली कामगिरी करेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. सेंट्रल झोन संघातही बीड जिल्ह्याचे चार खेळाडू निवडले गेले असून त्यांनाही रवाना करण्यात येणार आहे.

(पान २ वर...)

# आजच्या आरक्षण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा - हाफेज मन्सुर तय्यिबी

**बीड । सत्यवादी**

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण हा काळाची गरज बनला असून, येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी १७ एप्रिल रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम एल्गार आरक्षण मोर्चात सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हाफेज मन्सुर तय्यिबी यांनी केले आहे.



यावेळी बोलताना हाफेज मन्सुर तय्यिबी म्हणाले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थाचा नसून संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय्य हक्कासाठी आहे. शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही समाजाची जुनी व रास्त मागणी आहे. समाजातील अनेक तरुण आजही संधीअभावी मागे राहत

(पान २ वर...)






# तरुणाची माजलगावमध्ये गळफास घेऊन आत्महत्या

## पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद

**बीड । सत्यवादी**

जालना आणि परभणी जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आलेल्या १९ वर्षीय अशोक वसंत मंदे या तरुणाने माजलगाव येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे पोलीस अधीक्षकांनी त्याला जिल्ह्याबाहेर राहण्याचे आदेश दिले होते, मात्र आदेशाचे उल्लंघन करून तो माजलगावमध्येच वास्तव्य करत होता. १३ एप्रिल रोजी दुपारी त्याने घरातील लोखंडी अँगलला ओढणीने गळफास लावून आपले जीवन संपवले. या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. माजलगाव पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूसह आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस कर्मचारी गणेश नांगरे यांच्या तक्रारीवरून पुढील तपास सुरू असून या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.









This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

**हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२-१-५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र - ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.**
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ✲ संपादक : शेख रेहान शेख फेरोज**